## विभागप्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग,
### डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

### लघु निविदा सुचना

जा.क्र.विप्र/पसदु/आयसीएआर/१०४३/२०१२ दिनांक : २३.०१.२०१२

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे दिनांक १६.०२.२०१२ ते १९.०२.२०१२ या कालावधी दरम्यान होणा-या १३ व्या अखिल भारतीय कृषि आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा-२०१२ स्पर्धेकरीता पुढील बिछाना साहीत्य भाडेतत्वावर घ्यावयाचे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सिंगल बेड गादी | अंदाजे १३०० नग |
| २. | सिंगल बेड सिट | अंदाजे १३०० नग |
| ३. | सिंगल बेड चादर (सोलापूरी) | अंदाजे ३०० नग |
| ४. | सिंगल बेड उशी | अंदाजे ३०० नग |
| ५. | सतरंजी (१० x १२ किंवा ९ x १४) | अंदाजे ४०० नग |

तरी उपरोक्त साहीत्याचे प्रतिदिन भाडे वाहतुक व इतर करांसह या कार्यालयास **गुरूवार दिनांक ०२.०२.२०१२ दुपारी २.०० वा.** पर्यंत मोहोरबंद लिफाप्यात सादर करावेत, प्राप्त निविदा त्याच दिवशी दुपारी **४.०० वा.** समितीसमोर उघडण्यात येतील.

निविदेसंदर्भातील सविस्तर माहीती, शर्ती व अटी करीता खालील कार्यालयास संपर्क करावा तसेच सदर माहीती विद्यापीठाच्या www.pdkv.ac.in या वेबसाईटवर माहीतीकरीता उपलब्ध राहील. निविदेचे कोरे अर्ज रू ५००/- (रू. पाचशे फक्त) नगदी शुल्क भरून **मंगळवार दि. २४.०१.२०१२** पासून निम्न स्वाक्षरित अधिका-यांचे कार्यालयात कार्यालयीन कामाचे दिवशी व वेळेत उपलब्ध राहतील.

विभागप्रमुख
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग
तथा अध्यक्ष निवास व्यवस्था समिती,
१३ व्या अखिल भारतीय कृषि आंतर
विद्यापीठ क्रीडा स्पर्धा - २०१२
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

**परिशिष्ठ - अ**

निविदेचा अर्ज

## १३ व्या अखिल भारतीय कृषि आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०१२

अर्जाचा अ.क्र. ................
किंमत रूपये ५००/-
पावती क्र. व दिनांक ................

**प्रति,**

**विभागप्रमुख,**
**तथा अध्यक्ष, निवास व्यवस्था समिती,**
**पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग,**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**विषय : निवास व्यवस्थेकरीता बिछाना साहीत्य पुरविणेबाबत.**

संदर्भ : जाहीरात क्र.विप्र/पसदु/

**महोदय,**

मी / आम्ही डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे दि. १६.०२.२०१२ ते १९.०२.२०१२ या कालावधी दरम्यान आयोजीत क्रिडा स्पर्धेसाठी येणा-या पाहुण्यांच्या निवास व्यवस्थेकरीता संदर्भीय निविदा सुचनेच्या जाहीरातीनुसार आवश्यक बिछाना साहीत्य पुरविण्यासाठी माझ्या / आमच्या फर्मचे दर सोबत जोडल्याप्रमाणे कळवित आहे / आहोत.

मला उपरोक्त निविदेसंदर्भात विहीत केलेल्या अटी व शर्ती मान्य असून त्याचे उल्लंघन होणार नाही याची मी / आम्ही दक्षता घेवू. सोबत साहीत्याचा तपशिल, प्रती नग दर, वाहतुक खर्च व इतर सर्व अधिभारासह निविदेत एकूण दर नमुद करीत आहे / आहोत.

पुरवठा धारक/निविदाधारकाची स्वाक्षरी ................
फर्मचे नाव .......................................
मालकाचे संपुर्ण नाव व पत्ता
मोबाईल नंबर

**सहपत्रांची यादी :**

१. निविदापत्रक **परिशिष्ठ - ब व क**
२. अनामत/सुरक्षा रकमेचा धनाकर्ष क्र.------------- दि. --------------- रूपये -------------.
३. अनुभव व इतर आवश्यक प्रमाणपत्रे

# <u>परिशिष्ठ - ब</u>

**१३ व्या अखिल भारतीय कृषि आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०१२**

बिछाना साहित्यासाठी निविदा पत्रक

| साहीत्याचे नाव | पुरवठा करावयाची संख्या नग (अंदाजीत) | सर्व करांसह **प्रतीनग** भाडे अंकात (अक्षरात) | एकूण भाडे रक्कम **प्रतिदिन** अंकात (अक्षरात) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. गादी सिंगलबेड | १३०० | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | |
| २. बेडसीट सिंगलबेड | १३०० | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | |
| ३. चादर | ३०० | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | |
| ४. उशी | ३०० | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | |
| ५. सतरंजी<br>१० x १२<br>९ x १४ | ४०० | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | रू. --------------------<br>(अक्षरी ----------------------------<br>--------------------------) | |

निविदेच्या शर्ती व अटी मला/आम्हाला मान्य आहेत. उपरोक्त बिछाना साहित्य चांगल्या स्थितीत आमच्याकडे तयार असून विद्यापीठ पुरवठा आदेश देईल त्यानुसार मी/आम्ही साहित्य पुरविण्यास तयार आहोत.

पुरवठा धारक/निविदाधारकाची स्वाक्षरी

<u>परिशिष्ठ – क</u>

**१३ व्या अखिल भारतीय कृषि आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०१२**
**च्या आयोजनादरम्यान निवास व्यवस्था**
**करण्यासाठी लागणारे बिछाना साहीत्य भाडेतत्वावर पुरविण्यासंदर्भात शर्ती व अटी**

१. १३ व्या अखिल भारतीय कृषि आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०१२ चे आयोजनाकरीता विद्यार्थी व पाहुण्यांच्या निवास व्यवस्थेसाठी भाडेतत्वावर बिछाना साहित्याकरीता निविदा मागविण्यात येत आहेत.

२. सादर करावयाच्या निविदेसोबत अनामत/सुरक्षा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल बँकेचा धनाकर्ष विभागप्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला यांचे नावे असलेला रू. ५,०००/- (पाच हजार फक्त) चा धनाकर्ष (डी.डी.) जोडण्यात यावा.

३. निवास व्यवस्थेकरीता पुरविण्यात आलेल्या साहीत्याचा दर्जा गठीत समितीकडून तपासल्यानंतरच स्विकारण्यात येईल. समितीने जे साहीत्य स्विकारले नाही ते परत नेण्याची जबाबदारी संबधीत निविदाधारकाची राहील. व त्या खर्चाकरीता विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

४. पुरवठा करावयाचे साहीत्य हे समारंभाच्या आरंभापासून ते समारोपापर्यंत साहीत्याची विभागणी व उचल/परत नेण्यापर्यंत लागणारे एकुण मनुष्यबळ हे पुरवठाधारकाचे राहील. त्यासाठी वेगळा खर्च विद्यापीठ देणार नाही.

५. पुरवठा करावयाच्या साहीत्याची संख्या विचारात घेता संपुर्ण बिछाना साहित्याचा पुरवठा करणे शक्य असेल त्याच फर्मने निविदा भरावी.

६. वाहतूक खर्च, दैनंदिन हाताळणी व इतर सर्व करासह निविदेचे दर नमुद करावेत.

७. कोणत्याही परिस्थितीत निविदेत नमुद दरापेक्षा अतिरीक्त प्रदान केल्या जाणार नाही.

८. पुरवठाधारकाने निविदेसोबत पंजीकृत व्यवसाय प्रमाणपत्र, विक्रीकर/नोंदणी प्रमाणपत्र यासह इतर कायदेशीर प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडाव्यात.

९. पुरवठा करावयाच्या साहीत्याची संख्या व दर्जा लक्षात घेता एवढया मोठया प्रमाणास याअगोदर पुरविलेल्या कार्यक्रमांची यादी व अनुभव असल्याबाबत तसे प्रमाणपत्र किंवा त्याचा दाखला जोडण्यात यावा.

१०. निविदाधारकास पुरवठा करावयाचे साहीत्य वेगवेगळया ठिकाणी ठेवावयाचे असल्याने अशा प्रत्येक नियोजीत ठिकाणी कर्तव्यावर नेमलेल्या प्रभारी अधिका-यांकडे मोजणी करून द्यावी व समारोपानंतर संबधीतांकडून मोजून परत घ्यावे लागेल.

११. आवश्यकतेनुसार साहीत्यांच्या मागणी संख्येत कमी वा जास्त असा बदल होवू शकतो व त्याबाबत संपुर्ण अधिकार हा समितीचा राहील. प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या बिछाना साहित्य, संबधीत प्रभारी अधिकारी (अतिथीगृह / वसतीगृह) यांनी प्रस्तावित केल्यानुसार प्रदान करण्यात येईल.

१२. या संपुर्ण कालावधीत वाहतुक व दैनंदिन हाताळणी दरम्यान साहीत्याचे नुकसान झाल्यास त्याकरीता विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही.

१३. देयक अदा करण्याची कार्यपध्दती विद्यापीठ नियमानुसार करण्यात येईल.

१४. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर केल्या जाईल त्यांना साहीत्यांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. दुय्यम किंवा कमी दर्जाचे तसेच अस्वच्छ स्थितीतील बिछाना साहित्याचा पुरवठा नाकारला जाईल.

१५. निविदा स्विकारणे अथवा नाकारने यासंबधीचे अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार समितीस राहतील.

१६. उपरोक्त शर्ती व अटी हया पुरवठाधारकास बंधनकारक राहतील.

पुरवठाधारकाचे स्वाक्षरी व नाव